# रावेरात धडक अतिक्रमण निर्मूलन मोहीम; २५ वर्षांतील सर्वात मोठी कारवाई

## पालिका-पोलीस प्रशासनाच्या संयुक्त कारवाईत शहराने घेतला मोकळा श्वास; मोहीम आणखी १० दिवस सुरू राहणार

**रावेर । प्रतिनिधी**

रावेर शहरात मंगळवारी (दि. ७ जुलै) नगरपालिका आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने गेल्या सुमारे २५ वर्षांतील सर्वात मोठी अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. सकाळी १० वाजता सुरू झालेली ही कारवाई सायंकाळपर्यंत अविरत सुरू होती. पावसाने व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला तरीही प्रशासनाने मोहीम न थांबवता सातत्याने कारवाई सुरू ठेवली. त्यामुळे पालिका व पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे नागरिकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे.

नगरपालिकेचे मुख्याधिकारी अविनाश गांगुर्डे आणि पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली. फैजपूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांनी रावेरात तळ ठोकून संपूर्ण कारवाईवर देखरेख ठेवली. या मोहिमेसाठी पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक, पाच पोलीस उपनिरीक्षक, सुमारे ६० पोलीस कर्मचारी तसेच नगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कारवाईदरम्यान रावेर पोलीस ठाण्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, तेथून सावदा रोड आणि बुरहानपूर रोडपर्यंत दोन्ही बाजूंवरील अतिक्रमणे हटविण्यात आली. रस्त्यावर आलेले पत्र्याचे शेड, ओटे आणि इतर अनधिकृत बांधकामे जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आली. त्यामुळे शहरातील प्रमुख रस्ते अधिक रुंद, मोकळे आणि सुटसुटीत दिसू लागले आहेत.

या धडक कारवाईचा परिणाम म्हणून अनेक व्यापाऱ्यांनी स्वतःहून दुकानांसमोरील अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. सावदा रोडवरील संपूर्ण मटन मार्केट अतिक्रमणात असल्याने तेही हटविण्यात आले. याशिवाय बुरहानपूर रोडवरही मोठ्या प्रमाणात अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात आली.

मुख्य रस्त्यावरील व्यापाऱ्यांमध्ये या कारवाईमुळे धास्तीचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी स्वयंस्फूर्तीने रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यास प्राधान्य दिले. शहरातील वाढत्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि शहराचे विद्रूपीकरण होत होते. या मोहिमेमुळे प्रमुख मार्ग मोकळे झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी सांगितले की, अतिक्रमण निर्मूलन मोहीम आणखी दहा दिवस सुरू राहणार असून शहरातील सर्व प्रमुख रस्ते अतिक्रमणमुक्त केले जातील.

रावेर शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी पालिका व पोलीस प्रशासनाने उचललेल्या या धाडसी पावलाचे नागरिकांकडून स्वागत होत असून यामुळे शहराच्या सौंदर्यात आणि वाहतूक व्यवस्थेत सकारात्मक बदल होणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

**लोकप्रतिनिधींकडूनही सहकार्य**

या मोहिमेदरम्यान काही नगरसेवकांच्या मालकीची अतिक्रमणे हटविण्याची वेळ येण्यापूर्वीच संबंधित नगरसेवकांनी स्वतःहून ती काढून पालिकेच्या कारवाईस सहकार्य केले. तसेच आमदार अमोल जावळे यांच्या कार्यालयासमोरील रस्त्यावर आलेला मुख्य फलकही प्रशासन तेथे पोहोचण्यापूर्वी कार्यकर्त्यांनी हटवून मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद दिला.

**सावदा रोड अतिक्रमणमुक्त; महिलांना मोठा दिलासा**

शहरातील सावदा रोडवर मोठ्या प्रमाणात मटन मार्केट असल्याने या मार्गावरून शाळकरी मुली, महिला आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. दुर्गंधीमुळे अनेक महिलांना तोंडावर रुमाल धरून रस्ता पार करावा लागत होता. याबाबत वारंवार तक्रारी होऊनही कोणतीही ठोस कारवाई झाली नव्हती. मात्र या मोहिमेत संपूर्ण मटन मार्केट हटविण्यात आल्याने परिसर स्वच्छ झाला असून महिला वर्गाकडून पालिका प्रशासनाचे विशेष कौतुक होत आहे.

**संदीप पाटील यांच्या नेतृत्वाची सर्वत्र चर्चा**

अतिक्रमणविरोधी मोहिमेत पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी दाखविलेल्या धाडसी आणि निर्भीड नेतृत्वाची शहरभर चर्चा सुरू आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून शहरात शिस्त प्रस्थापित करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे नागरिकांकडून त्यांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक तुषार पाटील, मनोज महाजन, सुनील मोरे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे विशाल पाटील, श्रीकांत चव्हाण, प्रमोद पाटील, सुकेश तडवी, सुनील वंजारी, समाधान ठाकूर, मुकेश सोनवणे, गफ्फार, विष्णू पोहेकर, राहुल परदेशी, महिला पोलीस कर्मचारी उज्वला पवार, पूजा साळी, पीएसआय श्रीमती तडवी, आरसीपी पथकाचे हिरालाल धुमाळकर, रवींद्र भामरे, चैतन्य नारखेडे यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त सांभाळला.




**दोन्ही अधिकारी ठरले कणखर**

रावेरमध्ये अनेक वर्षे अतिक्रमण हटविण्याचे प्रयत्न अपुरे ठरत असल्याने ही मोहीम अशक्य मानली जात होती. मात्र नगरपालिकेचे मुख्याधिकारी अविनाश गांगुर्डे आणि पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी संयुक्तपणे धाडसी निर्णय घेत प्रभावी अंमलबजावणी केली. त्यामुळे या दोन्ही अधिकाऱ्यांच्या कणखर नेतृत्वाचे शहरभर कौतुक होत आहे.

**अतिक्रमण निर्मूलन मोहिमेसाठी पथकांची नियुक्ती;** विविध विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर जबाबदारी

रावेर शहरात राबविण्यात येत असलेल्या विशेष अतिक्रमण निर्मूलन मोहिमेसाठी नगरपरिषदेने विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती आहे. मुख्याधिकारी अविनाश गांगुर्डे यांच्या अध्यक्षतेखाली अतिक्रमण निर्मूलन, स्वच्छता तसेच चौकीदार व तांत्रिक सहाय्य अशा तीन स्वतंत्र पथकांची स्थापना करण्यात आली आहे.अतिक्रमण निर्मूलन व कायदासुव्यवस्था पथकात शहर अभियंता सुधीर माळी यांची पथक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली असून सदस्य म्हणून गोपाल राठोड, प्रशांत कोकाटे,स्वराज चव्हाण,अभिजित लबडे, योगेश भोई, दिपक सुरवाडे,तुषार रायपूरकर,प्रकाश शिंदे, राहुल बागरे,संतोष माळी यांचा समावेश करण्यात आला आहे.स्वच्छता, मनुष्यबळ व वाहन व्यवस्था पथकाचे प्रमुख नितेश चांगरे,सदस्य म्हणून गणेश रणशिंगे,तसेच सार्वजनिक स्वच्छता विभागातील सर्व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.चौकीदार व तांत्रिक सहाय्य पथकाचे प्रमुख कुणाल पाटील व सर्व कर्मचारी सहभागी होते.

**लोकप्रतिनिधींनी टाळला हस्तक्षेप;** प्रशासनाला धडक कारवाईची मोकळीक

रावेर शहरातील अतिक्रमण निर्मूलन मोहिमेदरम्यान एक महत्त्वाची बाब प्रकर्षाने समोर आली. शहरातील प्रमुख राजकीय नेते, नगराध्यक्षा, नगरसेवक तसेच इतर लोकप्रतिनिधींनी कारवाईत कोणताही हस्तक्षेप न करता प्रशासनाला पूर्णपणे काम करू दिल्याचे चित्र पाहायला मिळाले.

सामान्यतः अशा कारवायांवेळी विविध स्तरांवरून दबाव किंवा शिफारशी केल्या जातात. मात्र यावेळी प्रशासनाच्या कारवाईत कोणताही राजकीय हस्तक्षेप झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे नगरपालिका व पोलीस प्रशासनाला नियोजनबद्ध आणि निर्भयपणे अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविता आली.

या भूमिकेमुळे शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली अतिक्रमण निर्मूलन मोहीम अधिक प्रभावी ठरली असून, प्रशासनाच्या धडक कारवाईला लोकप्रतिनिधींनी दिलेल्या अप्रत्यक्ष सहकार्याची शहरात चर्चा होत आहे.

# जनता हायस्कूलच्या उपमुख्याध्यापकपदी सुरेश खोडपे यांची निवड

**जामनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील नेरी येथील अग्रगण्य शिक्षण संस्था जनता हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपमुख्याध्यापक पदी सुरेश पांडुरंग खोडपे यांची निवड करण्यात आली आहे. ते येथील विद्यालयात १९९३ पासून सेवेत असून मराठी विषयाचे अध्यापन करतात. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे चेअरमन प्रमोद पाटील सचिव वर्षा पाटील संचालक मंडळ तसेच मुख्याध्यापक आर. ए. पाटील यांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी तसेच संस्थेच्या नावलौकिकसाठी कटिबद्ध असल्याचे खोडपे यांनी सांगितले.



# रविदास भवन नवनिर्मिती व संरक्षण भिंतीसाठी ना.संजय सावकारे यांना मलकापूर चर्मकार समाजाच्या वतीने निवेदन

**मलकापूर । प्रतिनिधी**

मलकापुर शहरातील बुलढाणा रोड वरील मकसूद कॉलनीतील संत रविदास महाराज सांस्कृतिक भवनाचे बांधकाम निर्जीव झालेले आहे व पावसाळ्यात त्या ठिकाणी पुराचे पाणी येते त्यासाठी संरक्षण भिंत व सभागृहासाठी नवीन इमारत बांधण्यासाठी आपल्या स्थानिक विकास निधी मधून निधी देण्यात यावा याकरिता त्यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देतेवेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हा नेते माजी नगरसेवक रवींद्र गव्हाळे, संस्थेचे अध्यक्ष वसंत शेगोकार, उपाध्यक्ष पांडुरंग चिम, दिनकर दांडगे, शांताराम घुले, मेजर अशोक शकोकार, मनोज भोंडेकर यांच्यासह संस्थेचे सभासद व चर्मकार बांधव उपस्थित होते.



# किनगाव बाजारात लोणचे कैरी खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी

**चिंचोली, ता.यावल । वार्ताहर**

पावसाळ्याच्या प्रारंभासह लोणचे बनविण्याचा हंगाम सुरू झाल्याने किनगाव येथील मंगळवारच्या आठवडे बाजारात लोणचे कैरी खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर बाजारात कैऱ्यांची खरेदी साठी गर्दी केली होती.सकाळी चाळीस रूपये पासून ते साठ रुपये प्रती किलो प्रमाणे कैरी विकली गेली.तर दुपारी तीस ते पन्नास रुपये पर्यंत भावाने विक्री झाली

यावर्षी कैऱ्यांची आवक समाधानकारक असल्याने विविध दर्जाच्या लोणचे कैऱ्या विक्रीसाठी उपलब्ध होत्या. ग्राहकांनी आपल्या गरजेनुसार ५, १०, २० किलोपर्यंत कैऱ्यांची खरेदी केली. अनेक महिला घरगुती लोणचे तयार करण्यासाठी सकाळपासूनच बाजारात दाखल झाल्या होत्या.

व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार, दर्जानुसार कैऱ्यांचे दर निश्चित करण्यात आले असून ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. बाजारात कैऱ्यांसोबत मोहरी, मेथी, हळद, तिखट, मीठ, तेल आदी लोणच्यासाठी लागणाऱ्या साहित्याचीही मोठ्या प्रमाणात विक्री झाली.

ग्राहकांच्या वाढत्या गर्दीमुळे बाजारपेठ दिवसभर गजबजलेली होती. स्थानिक व्यापाऱ्यांनीही समाधान व्यक्त करत, पुढील काही आठवडे लोणचे कैऱ्यांची मागणी कायम राहण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# न.ह.रांका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात सेवापूर्ती सोहळा

**बोदवड । प्रतिनिधी**

येथील न. ह. रांका विद्यालयात बोदवड एज्युकेशन सोसायटी ,बोदवड चे अध्यक्ष मिठुलाल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात श्रीमती एम टी नेमाडे, एन यु बागुल ,जी एम गंगतीरे यांना निरोप देण्यात आला.

यावेळी उपाध्यक्ष अजय जैन, सचिव विकास कोटेचा, माजी चेअरमन एडवोकेट प्रकाशचंद सुराणा, ज्येष्ठ संचालक श्रीराम बडगुजर, पंजाबराव पाटील, आनंद जैस्वाल, रमेश जैन, उपमुख्याध्यापिका एम एस बडगुजर, पर्यवेक्षक एस के राणे, पी.बी. नरवाडे, संस्थेच्या विविध विभागातील पदाधिकारी, सेवानिवृत्तांचे आप्तेष्ट, विद्यालयातील शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी विद्यार्थिनी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक तथा अध्यक्ष सूचना दीपक चौधरी यांनी तर अनुमोदन शिवकुमार बडगुजर यांनी दिले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन तथा सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर तथा सत्कारमूर्ती यांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम पार पडला. सत्कारमूर्ती श्रीमती एम टी नेमाडे, एन. यु. बागुल, जी.एम. गंगतीरे, राजेंद्र मोपारी यांचा शॉल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व शाळेची प्रतिमा असलेली फ्रेम मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरव करण्यात आला.



यानंतर शिक्षकेतर प्रतिनिधी विनोद आंबुस्कर, शिक्षक प्रतिनिधी डॉ. संजय निकम, ऑफिस प्रतिनिधी मुख्याध्यापक पी एम पाटील यांनी सत्कारमूर्ती विषयी आपली मते मांडली तसेच सत्कारमूर्तींचे नातलग त्रंबक नेमाडे, निहारिका बागुल यांनी देखील आपली मते मांडली .संस्था प्रतिनिधी म्हणून एडवोकेट प्रकाशचंद सुराणा म्हणाले सेवानिवृत्तीनंतर आपण आपले जीवन कसे व्यतीत करणार आहात याचे नियोजन केले पाहिजे कारण सेवानिवृत्ती हा शेवट नसून नाविन्यपूर्ण व नवीन काही करण्याची सुरुवात आहे. सचिव विकास कोटेचा म्हणाले शाळेत ज्ञानदानाचे कार्य करीत असताना आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या देखील पार पाडणे हे खरोखरीच दिव्य असते .निस्वार्थपणे केलेली सेवा ही कधीही आपल्याला फलश्रुती देणारी असते. आजच्या सत्कारमूर्तींनी संस्थेमध्ये अशाच प्रकारची निस्वार्थ सेवा दिली आहे.

सत्काराला उत्तर देताना श्रीमती एमटी नेमाडे, एन यु बागुल, जी एम गंगतीरे यांनी आपल्या सेवा काळातील आठवणींना उजाळा देत संस्थेविषयी व संस्थाचालकांविषयी ऋणनिर्देश व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात मिठूलाल अग्रवाल यांनी सत्कारमूर्तींना सेवानिवृत्तीनंतर निरोगी व निरामय आयुष्याच्या शुभेच्छा देत त्यांच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशांत महाजन यांनी तर आभार के डी मिस्तरी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता अमोल नाईक यांनी म्हटलेल्या वंदे मातरम ने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक संघ- अतुल पाटील, डॉ. विश्वजीत सिसोदे, प्रा.जी व्ही चौधरी, प्रा.लक्ष्मण माळी तसेच विविध समित्या व सर्व शिक्षकवृंद यांचे सहकार्य लाभले.

# निंभोरा शाळेत पोलिसांनी राबविले नशामुक्त अभियान

**निंभोरा, ता.रावेर। वार्ताहर**

जळगाव पोलीस दलातर्फे निंभोरा पोलीस ठाणे अंतर्गत राबविण्यात आलेले नशा मुक्त शाळा,सुरक्षित महाराष्ट्र अभियान अभिषेक भास्कर पाटील विद्यालय खिर्डी तालुका रावेर येथे राबविण्यात आले.

सदर अभियाना अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून नशा मुक्तीची शपथ घेतली तसेच नशा मुक्तीची घोषवाक्य असलेली विविध पोस्टर बनवून जनजागृती केली यावेळी मा.उपविभागीय पोलीस अधिकारी फैजपूर अनिल बडगुजर साहेब यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक मिरा देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अभय ढाकणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.अभय ढाकणे यांनी सर्व विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले कि गुटखा, तंबाखू यासह नशा असलेले पदार्था पासून दूर राहून व्यसन मुक्त राहावे असे सांगितले.यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका,विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.



# अंतुर्ली व परिसरात खुलेआम राजरोसपणे अवैध धंदे

**अंतुर्ली, ता.मुक्ताईनगर । प्रतिनिधी**

अंतुर्ली व परिसराला अवैध धंद्याचा धुमाळ सुरु आहे खुलेआम सट्टा, पत्ता, ताडी, दारूची सरास विक्री केली जात आहे.

अंतुर्ली व परिसरात गावठी हातभट्टी दारू, ताळी, गांजा,विना परवाना देशी दारू इत्यादी नशेचे प्रकार राजरोशिने टपरीवर, हॉटेलवर, राजरोशपणे सुरु आहेत. गावाच्या चारीबाजूने पत्त्याचे मोठे मोठे क्लब सुरु आहे धामणडे, बेलसवाडी येथे हे सुरु आहेत हिस्सेदार गावाच्या स्थानिकांसोबत बुऱ्हाणपूर, भुसावळ, मुक्ताईनगर, वरोली येथील आहेत अशी ग्रामस्थान मध्ये चर्चा आहेत. या सर्व अवैध धंद्याना पोलीस प्रशासनाचा प्रतिसाद आहे का? असे नागरिक करीत आहेत.

तुकाराम मुंढे या अधिकाऱ्याचा सर्व दूर धाक( दबदबा ) आहे परंतु पोलीस प्रशासनाचा कोणत्याच प्रकारचा दबदबा वाटत नाही....

दारूमुळे कितीतरी तरुणांचे जिवन धोक्यात आलेले आहेत. तरी सुद्धा दारूबंदी विभाग कागदीघोड्या नाचवून कारवाई दाखवत आहे.

हातभट्टी दारूमध्ये केमिकलचा मोठा प्रमाणात वापर केला जात आहे. त्यामुळे दारू पिणारे यांच्या हातपायावर सूज, पोट फुगूने, लिवर, किडनी खराब होऊन तडफडून तडफडून मरणाला शरण येणे, दारूमुळे अनेकांचे संसार उघड्यावर पडलेले आहेत.घराची आर्थिक परिस्थिती वाईट, लहान लहान मुलं घेऊन अनेक विधवा स्त्रिया अंतुर्ली व परिसरातआपल्या दयनीय संसाराचा गाडा हाकताना दिसत आहे. अनेकांच्या संसाराची वाटोळे झाले आहे. पोलीस प्रशासनाच्या डोळ्यासमोर हे सर्व कृत्य सुरू आहे. या अवैध धंद्यांना पूर्णतः अभय पोलीस प्रशासनाकडून मिळत आहे का?असे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे.

# ग्लोबल मिशन स्कूलला आदिवासी विकास विभागाचे सहआयुक्त कपिल पवार यांची भेट

**पारोळा । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आदर्श निर्माण करणाऱ्या ग्लोबल मिशन स्कूल, बाहुटे (ता. पारोळा) येथे आदिवासी विकास विभागाचे सहसचिव कपिल पवार यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. शाळेतील आधुनिक सुविधा, शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांची पाहणी करून त्यांनी शाळेच्या कार्याचे मुक्तकंठाने कौतुक केले.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेला जलतरण तलाव, विविध खेळांसाठी स्वतंत्र टर्फ व सुसज्ज क्रीडांगणे, शाळेच्या परिसरातील प्रेरणादायी विचारफलक तसेच विकसित करण्यात आलेले बोटॅनिकल गार्डन यांची विशेष पाहणी केली. या सर्व सुविधा पाहून ते प्रभावित झाले.



यावेळी बोलताना कपिल पवार म्हणाले, ग्रामीण भागात केवळ जळगाव जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण खान्देशात ग्लोबल मिशन स्कूलसारखी शाळा मी आजपर्यंत पाहिलेली नाही. अशा प्रकारच्या शाळा ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत. त्यांनी पातोंडा परिसरात आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहितीही उपस्थितांना दिली.

या प्रसंगी शाळेचे चेअरमन मनोहर पाटील यांच्या हस्ते कपिल पवार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शाळेचे तज्ज्ञ संचालक जयदीप पाटील तसेच रमेश पाटील ,प्राचार्य उमाकांत बुंदेले यांची उपस्थिती होती. या भेटीमुळे ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या ग्लोबल मिशन स्कूलच्या प्रयत्नांना नवी प्रेरणा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# नशा न करता जीवनाचा आनंद घ्या!

## प्रा.डॉ.एस.ए.पाटील यांचे प्रतिपादन

**ऐनपूर,ता.रावेर । वार्ताहर**

ऐनपुर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभागामार्फत टी. बी. फ्री इंडिया निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जे.बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ एस एन वैष्णव हे होते. तर प्रमूख वक्ते म्हणून डॉ एस ए पाटील होते. तर प्रमूख पाहुणे म्हणून डॉ.एस. बी. पाटील, प्रा. व्ही. एच. पाटील डॉ पी आर महाजन, प्रा व्हि एच पाटील, उपस्थित होते. डॉ एस ए पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात टी.बी. मुक्त भारत झाले पाहिजे व त्याचे जीवनावर होणारे भयंकर वाईट परीणाम या विषयी मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ एस एन वैष्णव यांनी महाविद्यालयाच्या परिसरात कोणीही नशा करणार नाही याविषयी कळकळीने सांगितले आणि टी. बी हा रोग संसर्गजन्य आजार असून धूम्रपानापासून दुर राहावे त्याचे दुष्परिणामही विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या कार्यक्रमाला डॉ एस बी पाटील, डॉ जे पी नेहेते, प्रा अंकुर पाटील, डॉ एन यु बारी उपस्थीत होते. या कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.एस. पी . उमरीवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक प्रा.एच. एम. बाविस्कर यांनी मानले. श्री श्रेयस पाटील, कु. अर्पिता चौधरी, कु. वैष्णवी महाजन, कु. प्रतिक्षा पाटील, कु. रितीका महाजन कु. श्रुतिका लवंगे कु. नेहा काठोके, कु. स्वस्तीका चौधरी, कु. तेजस्विनी महाजन, कु. नेहा महाजन, कु. पुर्वजा महाजन, कु. वेदीका पाटील, कु. श्रूती महाजन, अंकुश राठोड, श्रेयस पाटील, आणि इतर विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले, महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.




फैजपूर नगरपरिषद, फैजपूर, जि.जळगाव
दूरध्वनी क्र.०२५८५-२४५२५४
E-mail-faizpurnp@gmail.com
FAIZPUR MUNICIPAL COUNCIL ESTD:1889
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**अतिक्रमण निर्मूलन विशेष मोहीम बाबत सूचना**

फैजपूर नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक गटारी, सार्वजनिक रस्ते तसेच इतर सार्वजनिक जागांवर करण्यात आलेल्या अनधिकृत अतिक्रमणांविरुद्ध नगर परिषदेमार्फत विशेष अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात येणार आहे.

यापूर्वी संबंधित अतिक्रमणधारकांना सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत विधिवत नोटिसा बजाविण्यात आलेल्या असूनही अनेक ठिकाणी अतिक्रमणे कायम असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नगर परिषदेमार्फत संबंधितांना अंतिम व अखेरची नोटीस देण्यात आलेली आहे. नगर परिषदेकडून दिनांक दि.०९/०७/२०२६ पासून विशेष अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात येणार असून, या मोहिमेदरम्यान सार्वजनिक गटारी, रस्ते व सार्वजनिक जागांवरील अनधिकृत बांधकामे, ढापे, संरचना व इतर अतिक्रमणे कोणतीही पुढील पूर्वसूचना न देता हटविण्यात येतील.

सर्व नागरिकांनी सदर अतिक्रमणे स्वखर्चाने तत्काळ काढून सार्वजनिक जागा मूळ स्थितीत उपलब्ध करुन द्याव्यात. अन्यथा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम तसेच लागू असलेल्या इतर कायदे व नियमांनुसार नगर परिषदेमार्फत अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येईल. तसेच या कारवाईसाठी होणारा मनुष्यबळ, यंत्रसामग्री, वाहतूक व इतर प्रशासकीय खर्च संबंधित अतिक्रमणधारकांकडून कायदेशीर पद्धतीने वसूल करण्यात येईल. अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईदरम्यान अतिक्रमणातील बांधकाम, साहित्य किंवा इतर मालमत्तेस झालेल्या कोणत्याही प्रकारच्या नुकसानास नगर परिषद जबाबदार राहणार नाही. त्यामुळे सर्व संबंधितांनी नोटीसीची गंभीर दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही तत्काळ करावी, असे आवाहन फैजपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री.अविनाश गांगोडे यांनी केले आहे.

सही/-
(अविनाश गांगोडे)
मुख्याधिकारी
फैजपूर नगरपरिषद, फैजपूर